ePaper

**मोठा निर्णय झाला! खामेनेईंच्या अंत्यसंस्काराला भारत उपस्थित राहणार**

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

३२ लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेसाठी विधानसभेत आवाज!

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 30 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## नसरापूर अत्याचार प्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा

# 'त्या' चिमुकलीला न्याय मिळाला..!

**महाईन्यूज । भोर**

**भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणारा आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी सोमवारी फाशीची शिक्षा सुनावली. कांबळे याला विशेष न्यायालयाने गुरुवारी (२५ जून) दोषी ठरवून निकाल राखून ठेवला होता.**

महाराष्ट्रदिनी १ मे रोजी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला होता. या खटल्यात सरकार आणि बचाव पक्षाकडून अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला. न्यायालयात सरकार पक्ष, बचाव पक्ष; तसेच बालिकेच्या कुटुंबीयांच्या वतीने बाजू मांडण्यात आली होती. त्यानंतर गुरुवारी (२५ जून) कांबळे याला दोषी ठरवून आरोपपत्रात नमूद करण्यात आलेल्या कलमांना किती शिक्षा आहे, याची माहिती दिली होती. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली.

या खटल्यात २० जूनला अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी (२५) सरकार पक्ष, बचाव पक्ष आणि मूळ फिर्यादी यांनी आपली बाजू मांडली. या वेळी कांबळेला हजर करण्यात आले होते. तुझ्या विरोधात दोषारोपपत्रात नमूद असलेले सर्व आरोप सिद्ध झाले आहेत. तसेच दोषारोपपत्रात नमूद असलेल्या कोणत्या कलमांना किती शिक्षा आहे, याची माहिती न्यायालयाने आरोपीस दिली. 'हा गुन्हा 'दुर्मिळातील दुर्मीळ' आहे. आरोपी कांबळे याला फाशीची शिक्षा देण्यात यावी, आरोपी कांबळे याने केलेले कृत्य घृणास्पद, क्रूर आणि समाजमन हादरवणारे आहे. त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा द्यावी. महिला आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात आहेत. कायदे अस्तित्वात असताना अशा प्रकारचे गुन्हे घडतात. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना कायद्याचा धाक बसविण्यासाठी कठोर शिक्षा देण्यात यावी,' अशी विनंती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी युक्तिवादात केली होती. मिसर यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या १२ महत्त्वपूर्ण निकालांचा संदर्भ दिला होता. बचाव पक्षाकडून ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाने सादर केलेला डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे, सीसीटीव्ही चित्रीकरण, परिस्थितीजन्य पुरावे, साक्षीदारांचे जबाब या बाबी विचार घेऊन आरोपीने केलेला गुन्हा सिद्ध होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते.

पीडित बालिकेच्या शरीरावर १८ गंभीर जखमा झाल्याचे आढळून आले होते. आरोपीने यापूर्वी दोन महिलांवर अत्याचार केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते.

### कांबळेला या कलमांनुसार शिक्षा

आरोपी भीमराव कांबळे याच्यावर कलम १३७ (२), ६५ आणि ६५ (बलात्कार), १०३ (खून), ७४ (विनयभंग करण्याच्या उद्देशाने बळजबरी करणे), १४०, (१) यासह लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (पोक्सो) कलम ४, ६, ८, १२ या कलमांन्वये आरोपपत्र दाखल करण्यात आले. या सर्व कलमांन्वये आरोप सिद्ध झाले आहेत.

### सरकार पक्षाचे युक्तिवादातील मुद्दे

- आरोपीने नियोजन करून थंड डोक्याने खून केला.
- दोन गुन्ह्यांत आरोपी निर्दोष सुटल्याने त्याला कायद्याचा धाक राहिला नाही.
- सुनावणीच्या दरम्यान आरोपीच्या चेहऱ्यावर पश्चातापाचा लवलेश नाही.
- आरोपी लैंगिकदृष्ट्या सक्षम.
- मृत्युदंडाची शिक्षा योग्य.
- समाजात कठोर संदेश जाण्यासाठी कठोर शिक्षेची मागणी.





### दोन महिन्यांत खटला निकाली

महाराष्ट्रदिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून खून करण्यात आल्याच्या प्रकरणाचा निकाल हा राज्याच्या न्यायालयीन इतिहासात दोन महिन्यांत सुनावणी होऊन निकाली लागणारा पहिला खटला ठरला.

तपासासाठी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक करण्यात आले. या पथकात सहा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी या प्रकरणाचा तपास केला. या खटल्यात सीसीटीव्ही चित्रीकरण, वैद्यकीय पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, साक्षीदारांची साक्ष अशा विविध बाजूंनी तपास करून पोलिसांनी गुन्हा घडल्यानंतर १५ दिवसांत न्यायालयात १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्रासह ५५ पेक्षा जास्त साक्षीदारांचा जबाब, परिस्थितीजन्य पुरावे, तसेच तांत्रिक पुरावे जोडण्यात आले. विशेष न्यायालयात २१ मेपासून या खटल्याची दैनंदिन सुनावणी झाली. हे प्रकरण संवेदनशील असल्याने बंद दाराआड (इन कॅमेरा) सुनावणी झाली.

# पुण्यात तीव्र पाणीटंचाई!

## बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरल्यास थेट ‘काम बंद’ आणि दंडात्मक कारवाई

**महाईन्यूज | पुणे**

**शहरामध्ये सद्यस्थितीत तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, पाण्याचा थेंब् थेंब वाचवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. असे असतानाही, शहरातील काही भागांमध्ये बांधकाम प्रकल्पांसाठी सर्रासपणे पिण्याच्या पाण्याचा वापर केला जात असल्याचे समोर आले आहे.**




या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका प्रशासनाने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. बांधकाम प्रकल्पांवर पिण्याच्या पाण्याचा बेकायदेशीर वापर होत असल्याचे आढळल्यास, संबंधित बांधकाम तात्काळ बंद करून दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तपासणीसाठी महापालिकेने विशेष पथके नेमण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पुणे महापालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली.

शहरात पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे आणि पाणीटंचाईची तीव्रता कमी व्हावी, यासाठी महापालिकेने बांधकाम व्यावसायिकांना पिण्याच्या पाण्याचा वापर न करण्याचे आवाहन केले होते. मात्र, अनेक भागांत या आवाहनाकडे स्पष्ट दुर्लक्ष केले जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना दुसरीकडे बांधकाम प्रकल्पांवर पिण्याचे पाणी वापरले जात असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. ही बाब गांभीर्याने घेत प्रशासनाने आता आपली तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे.

### थेट ‘काम बंद’ची नोटीस आणि दंड

तपासणी दरम्यान कोणत्याही बांधकाम साईटवर महापालिकेचे पिण्याचे पाणी वापरले जात असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधितांना कोणतीही पूर्वसूचना किंवा सवलत न देता थेट ‘काम बंद’ ची नोटीस बजावण्यात येईल. त्यानंतर संबंधित बांधकाम व्यावसायिकावर मोठी दंडात्मक आणि प्रशासकीय कारवाई केली जाईल, असा कडक इशारा प्रशासनाने दिला आहे. बांधकाम प्रकल्पांसाठी केवळ प्रक्रिया केलेले सांडपाणी किंवा इतर पर्यायी पाण्याचा वापर करणे बंधनकारक असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले आहे. महापालिकेच्या या आक्रमक भूमिकेमुळे बेकायदेशीरपणे पाणी वापरणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

### अभियंत्यांच्या खांद्यावर जबाबदारी

या मोहिमेअंतर्गत शहरातील बांधकाम प्रकल्पांची कडक तपासणी करण्यासाठी महापालिकेने विशेष पथके तयार केली आहेत. यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागातील उपअभियंते आणि कनिष्ठ अभियंत्यांवर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रत्येक अधिकाऱ्याला त्यांच्या वॉर्ड मधील बांधकामांची नियमितपणे आणि अचानक भेट देऊन पाहणी करण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.

# सिया गोयल अन् चेतन चौधरीला 5 दिवसांची पोलीस कोठडी

**महाईन्यूज | पुणे**

**महाराष्टाला हादरवून सोडणाऱ्या लोहगड केतन अग्रवाल मृत्यूप्रकरणी त्याची भावी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन यास पोलिसांनी अटक केली असून त्यांना देण्यात आलेली पोलीस कोठडी आज संपत आहे. त्याच पार्श्वभूमीवर आरोपी सिया आणि चेतनला न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. याप्रकरणी, आरोपीच्या वकिलांनी न्यायालयात बाजू मांडताना तपास पूर्ण झाल्याने अधिकच्या पोलीस कोठडीची गरज नसल्याचे म्हटले. तर, केतन अग्रवाल कुटुंबीयांच्यावतीने आणि सरकारी वकिलांनी तपासातील काही बाबी शिल्लक असल्याचा युक्तिवाद करत पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी केली होती. त्यानुसार, दोन्ही आरोपींना 3 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.**



आरोपींनी कट रचला असल्याचं निष्पन्न झालं आहे, मात्र गुन्हा कसा केला याचा तपास करायचा आहे. कट कुठं बसून केला हे तपासायचे आहे. सियाप्रमाणे चेतनला घेऊन रिक्रियेशन करायचं आहे. लोहगडावर अनेकांशी संवाद साधला आहे, बालीला प्री वेडिंग शूटला जायचं नव्हतं म्हणून, पासपोर्ट फाडले, तो केतनचा पासपोर्ट शोधायचे आहे. लोहगडावर जाऊन रेकी केली का? हे तपासायचे आहे? या कटात कोणी सहभागी आहे का? केतनचा मोबाईल काही वेळाने देण्यात आला, त्यातील माहिती रिकव्हर करायची आहे, त्यांनी माहिती लपवली आहे, ती मिळवायची आहे. तसेच, चेतनचे कपडे हस्तगत करायचे आहेत, त्यामुळे आरोपींना सात दिवसांची पीसी मिळावी, अशी मागणी पोलिसांच्यावतीने करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने 5 दिवसांची पीसी दिली.

दरम्यान, आरोपींना केलेली अटक इलिगल आहे, आमचा अर्ज दाखल करून घ्या, अशी मागणी आरोपींच्या वकिलांनी सुरुवातील न्यायालयात केली. याप्रकरणी तांत्रिक तपास, चौकशी, नाट्य रूपांतर झालं. आता पुढचा तपास तांत्रिक आहे, मग पीसीची गरज वाटत नाही, असा युक्तिवाद सियाच्या वकिलांनी केला होता. नाट्य रूपांतर करायची मागणी केली जातीये, हे आपल्या देशात झालेलं नाही. दरीत पडून मृत्यू झालाय, पण इथं हत्या झाली म्हटलं जातंय. आई-वडील म्हणतायेत म्हणून याला हत्या म्हणता येणार नाही. हा गुन्हा बेलेबल आहे? त्यामुळे पीसी देऊ नये, असेही सियाचे वकील विपुल दुष्यम यांनी म्हटले.

# ३२ लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेसाठी विधानसभेत आवाज!

## आमदार महेश लांडगे यांची विधानसभेत सरकारकडे ठाम मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३२ लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत चर्चेत आला. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी आज विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय (PUBLIC DISTRIBUTION SYSTEM – PDS) स्थापन करण्याची तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक (QUOTA) मंजूर करण्याची जोरदार मागणी केली आहे.**




### ३२ लाख नागरिकांना होणार थेट फायदा

पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय सुरू झाल्यास शिधापत्रिका दुरुस्ती, नवीन लाभार्थी नोंदणी, नाव समावेश-वगळणे, तक्रार निवारण आणि अन्नधान्याचे वेळेवर वितरण यांसारख्या सेवांना गती मिळणार आहे. तसेच शहराच्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर झाल्यास राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होणार आहे.

मुंबई येथील विधानभवन येथे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यावेळी आमदार लांडगे यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे औद्योगिक आणि नागरी शहर असून, मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार व वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, शहरातील संपूर्ण अन्नधान्य वितरणाचे नियोजन आणि प्रशासकीय कामकाज आजही पुणे शहरातील कार्यालयामार्फत केले जात असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अन्नधान्याचे वेळेवर वितरण, नवीन लाभार्थ्यांची नोंदणी, शिधापत्रिकांमधील दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे किंवा वगळणे, तक्रार निवारण, इष्टांक वाटप यासह विविध प्रशासकीय कामांमध्ये मोठा विलंब होत असून, त्याचा फटका पात्र व गरजू लाभार्थ्यांना बसत आहे. आमदार लांडगे यांनी सरकारकडे पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाला प्रशासकीय मान्यता देण्याबरोबरच आवश्यक पदनिर्मिती करण्याची मागणी केली. तसेच शहराच्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर करून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यासोबतच ई-राशन कार्ड, ऑनलाइन सेवा, लाभार्थी पडताळणी, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि वितरण व्यवस्थेवर स्थानिक स्तरावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कार्यालय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. आमदार लांडगे यांनी हा विषय लाखो नागरिकांच्या अन्नसुरक्षेशी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी आणि जनहिताशी संबंधित असल्याने शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी केली.

> “पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय ही काळाची गरज आहे. स्थानिक पातळीवर सक्षम यंत्रणा उभी राहिल्यास लाभार्थ्यांना वेळेवर सेवा मिळेल, वितरण व्यवस्थेत पारदर्शकता वाढेल आणि लाखो नागरिकांची अन्नसुरक्षा अधिक प्रभावीपणे सुनिश्चित होईल. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे.
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# वाकड-ताथवडेत टाक्या तयार, पण पाणीच नाही; नगरसेवक राहुल कलाटे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण झालेला पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी पवना बंद जलवाहिनी प्रकल्प तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे मत नगरसेवक राहुल कलाटे यांनी व्यक्त केले. गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ विविध कारणांमुळे रखडलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे पुन्हा प्राधान्यक्रमावर आला असून, ३ जुलै रोजी मुंबई येथे त्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या बैठकीकडून शहरवासीयांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.**




### पाणी असूनही टाक्या रिकाम्याच!

वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरात ४५ लाख लिटर आणि २५ लाख लिटर क्षमतेच्या उंच पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प रखडल्याने या टाक्यांपर्यंत पुरेसे पाणी पोहोचत नाही. परिणामी कोट्यवधी रुपयांची पायाभूत सुविधा वापराविना असून, नागरिकांना नियमित आणि पुरेशा पाणीपुरवठ्यासाठी अद्याप प्रतीक्षा करावी लागत आहे.

कलाटे म्हणाले की, माझ्या प्रभागातील वाकड, ताथवडे आणि पुनावळे येथे ४५ लाख लिटर आणि २५ लाख लिटर क्षमतेच्या उंच पाण्याच्या टाक्यांची उभारणी पूर्ण झाली आहे. मात्र, पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने या टाक्या अद्याप कार्यान्वित करता आलेल्या नाहीत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांची पायाभूत सुविधा असूनही नागरिकांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पवना बंद जलवाहिनी प्रकल्प हा केवळ पाणीपुरवठ्याचा नव्हे, तर भविष्यातील पाणी सुरक्षेचा विषय असल्याचे सांगत, मावळमधील शेतकऱ्यांना न्याय देतानाच पिंपरी-चिंचवडकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक निर्णय घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री नुकतेच वाकड परिसराच्या दौऱ्यावर आले असताना, पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाला प्राधान्य दिल्याबद्दल त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आभार व्यक्त केल्याचेही कलाटे यांनी सांगितले. या प्रकल्पासाठी महापालिका सभागृहात सातत्याने पाठपुरावा केला असून, भविष्यातही शासन स्तरावर हा प्रकल्प लवकर पूर्ण व्हावा यासाठी प्रयत्न सुरूच राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

> “वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील लाखो लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या पाण्याअभावी वापराविना आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पवना बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण होणे ही काळाची गरज आहे. मावळच्या शेतकऱ्यांना न्याय देत पिंपरी-चिंचवडकरांना कायमस्वरूपी पाणी सुरक्षा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सकारात्मक निर्णय घेतील, असा मला पूर्ण विश्वास आहे.”
> - राहुल कलाटे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महापालिका.



## भूमिका

**भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या निष्पाप बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपीला विशेष न्यायालयाने सुनावलेली फाशीची शिक्षा ही केवळ एका गुन्हेगाराला दिलेली शिक्षा नाही, तर समाजातील विकृत मानसिकतेविरुद्ध न्यायव्यवस्थेने दिलेला कठोर संदेश आहे.**

# न्यायाचा विजय, पण समाजासमोरील आव्हान कायम...





अशा अमानुष कृत्यांना कोणतीही सहानुभूती नाही आणि अशा नराधमांना समाजात स्थान नसल्याचे न्यायालयाने आपल्या निर्णयातून अधोरेखित केले आहे. या प्रकरणाची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अवघ्या दोन महिन्यांत खटल्याचा निकाल लागला. महाराष्ट्राच्या न्यायालयीन इतिहासात इतक्या कमी कालावधीत अशा संवेदनशील खटल्याचा निकाल लागणे ही उल्लेखनीय बाब आहे. तपास यंत्रणांनी केलेली वेगवान कारवाई, वैज्ञानिक पुराव्यांचा प्रभावी वापर, सरकारी पक्षाचा भक्कम युक्तिवाद आणि न्यायालयाची संवेदनशीलता यामुळे न्याय वेळेत मिळू शकतो, यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

गुन्हा घडल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी अवघ्या १५ दिवसांत १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. डीएनए अहवाल, सीसीटीव्ही चित्रीकरण, वैद्यकीय व न्यायवैद्यकीय पुरावे, साक्षीदारांचे जबाब आणि तांत्रिक पुरावे यांच्या आधारे आरोपीविरुद्ध अभेद्य पुराव्यांची साखळी उभी करण्यात आली. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी प्रभावीपणे मांडलेल्या बाजूमुळे न्यायालयाला 'दुर्मिळातील दुर्मीळ' या निकषावर मृत्युदंडाची शिक्षा सुनावणे शक्य झाले. या संपूर्ण प्रक्रियेत तपास यंत्रणा, सरकारी पक्ष आणि न्यायव्यवस्था यांनी केलेले काम कौतुकास्पद आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाचे स्वागत करत "अशा नराधमांना समाजात राहण्याचा अधिकार नाही," असे स्पष्ट मत व्यक्त केले. त्यांनी तपास अधिकाऱ्यांचे आणि सरकारी वकिलांचे अभिनंदन केले, ही बाबही महत्त्वाची आहे. शासन, पोलीस आणि न्यायव्यवस्था एकत्रितपणे काम केल्यास न्याय केवळ मिळत नाही, तर तो वेळेत मिळू शकतो, याचा हा आदर्श ठरू शकतो.

तथापि, या शिक्षेनंतरही समाजाने आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळी अशा घटना घडल्यानंतर कठोर शिक्षेची मागणी होते, पण अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती थांबवण्यासाठी केवळ शिक्षा पुरेशी नाही. बालकांच्या सुरक्षेबाबत समाजात अधिक जागरूकता निर्माण करणे, संशयास्पद व्यक्तींवर लक्ष ठेवणे, मुलांना 'गुड टच-बॅड टच'चे शिक्षण देणे, पालकांनी सतर्क राहणे आणि महिलां-मुलांविरोधातील गुन्ह्यांबाबत शून्य सहिष्णुतेची भूमिका घेणे तितकेच आवश्यक आहे.

नसरापूर प्रकरणातील निकाल हा न्यायव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचा आणि कायद्याच्या धाकाचा महत्त्वपूर्ण संदेश आहे. मात्र, खरी जबाबदारी समाजाची आहे. अशी वेळ पुन्हा कोणत्याही कुटुंबावर येऊ नये, हीच या निर्णयामागील खरी अपेक्षा आहे. न्यायालयाने आपले कर्तव्य पार पाडले आहे; आता सुरक्षित, संवेदनशील आणि जबाबदार समाज उभारणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

## प्रासंगिक »

### वेळेचे चक्र

**एका लष्करी घोड्याला आपल्या ताकदीचा आणि ऐटदार रूपाचा खूप गर्व होता.**

एके दिवशी त्याने ओझे वाहणाऱ्या गाढवाला रस्त्यात अपमानित केले. गाढव शांतपणे बाजूला झाले, पण मनात म्हणाले, "देवा, पुढच्या जन्मी मला घोडा कर, पण त्याचा अहंकार नको."

काही दिवसांनी युद्धात घोडा गंभीर जखमी झाला. तो लढाईसाठी निकामी ठरल्याने मालकाने त्याला एका कुंभाराला विकले. आता तोही गाढवासारखेच ओझे वाहू लागला. हे पाहून गाढवाच्या मनात दया निर्माण झाली. ते म्हणाले, "देवा, वैभव कायम राहत नाही. गर्वामुळे याला आज कुणाची सहानुभूतीही मिळत नाही. मी आहे तो साधा गाढवच बरा."

- तात्पर्य : वैभव, सत्ता आणि ताकद कायमस्वरूपी नसते. काळ बदलत असतो. म्हणून यशाच्या काळात नम्रता ठेवावी, इतरांचा अपमान करू नये आणि प्रत्येकाशी आदराने वागावे. अहंकाराचा शेवट नेहमी दुःखातच होतो, तर विनयशीलता माणसाला खरा मोठेपणा मिळवून देते.

व्हेनेझुएलामध्ये झालेल्या भीषण भूकंपानंतर काही दिवसांतच जपान, अमेरिका, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्येही भूकंपाचे धक्के बसल्याने जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भूकंपांची मालिका की निव्वळ योगायोग?



एकामागून एक घडलेल्या या घटनांमुळे अनेकांच्या मनात हे सर्व भूकंप परस्परांशी संबंधित आहेत का, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. मात्र, भूगर्भशास्त्रज्ञांनी याबाबत स्पष्ट केले आहे की, या घटना परस्परांशी जोडलेल्या नसून हा निव्वळ योगायोग आहे. भूकंप ही पृथ्वीच्या नैसर्गिक प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील टेक्टोनिक प्लेट्स सतत हालचाल करत असतात. या प्लेट्समध्ये निर्माण होणारा ताण विशिष्ट मर्यादा ओलांडला की अचानक ऊर्जा मुक्त होते आणि भूकंप होतो. त्यामुळे प्रत्येक भूकंपामागील कारण स्थानिक भूगर्भीय रचनेशी संबंधित असते. हजारो किलोमीटर अंतरावर झालेल्या एका भूकंपामुळे दुसऱ्या देशात भूकंप होतो, असा कोणताही वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही.

व्हेनेझुएलातील दुर्घटना मात्र अत्यंत भीषण होती. दोन शक्तिशाली भूकंपांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. शेकडो इमारती जमीनदोस्त झाल्या आणि मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. अशा संकटाच्या काळात बचाव पथकांनी दाखवलेली तत्परता आणि ढिगाऱ्याखालून जिवंत व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न मानवतेची आशा जिवंत ठेवतात.

दरम्यान, जपान, कॅलिफोर्निया, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्येही भूकंप झाले. या सर्व घटना भूकंपप्रवण पट्ट्यांमध्ये घडल्या आहेत. त्यामुळे त्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून अपेक्षित स्वरूपाच्या मानल्या जातात. तज्ज्ञांचे मत स्पष्ट आहे की, या घटनांची वेळ जरी जवळपास असली तरी त्यांचा परस्परांशी कोणताही थेट संबंध नाही.

आज तंत्रज्ञानामुळे जगभरातील अगदी लहान भूकंपांचीही अचूक नोंद केली जाते. त्यामुळे भूकंपांचे प्रमाण वाढल्याचा भास होतो. प्रत्यक्षात भूकंपांची संख्या पूर्वीइतकीच आहे; बदल झाला आहे तो त्यांची नोंद करण्याच्या क्षमतेत. त्यामुळे अफवा किंवा भीती पसरविण्याऐवजी वैज्ञानिक माहितीवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे.

भूकंप रोखणे मानवाच्या हातात नाही, पण त्याचे परिणाम निश्चितच कमी करता येतात. भूकंपरोधक इमारती, प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पूर्वतयारी, नागरिकांचे प्रशिक्षण आणि आधुनिक इशारा प्रणाली यामुळे हजारो जीव वाचू शकतात. नैसर्गिक आपत्तीसमोर घाबरण्यापेक्षा सज्ज राहणे, हीच काळाची गरज आहे. विज्ञानावर आधारित माहिती आणि सक्षम आपत्ती व्यवस्थापन यांची सांगड घातल्यास भविष्यातील संकटांचा सामना अधिक प्रभावीपणे करता येईल.

## ।। अभंगवाणी ।।



न देखें न बोलें नाइकें आणीक ।
बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥

सासुरें माहेर मज नाहीं कोणी ।
एक केलें दोन्ही मिळोनियां ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# TET पेपरफुटी प्रकरणी दोषींवर मकोका!

## मंत्री दादा भुसेंची सभागृहात माहिती; पुढील वर्षाच्या परीक्षेसाठीही मोठा निर्णय

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्रात पुन्हा एकदा शिक्षक पात्रता परीक्षा TET पेपर फुटीच्या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली. २८ जून २०२६ रोजी होणारा टीईटीचा पेपर आदल्याच दिवशी फुटल्याचे उघडकीस आले असून, या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर थेट संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करणार असल्याचे शिक्षण मंत्र्यांनी सांगितले. परंतू यावेळी विरोधकांनी सरकारचा निषेध करत सभागृहातून सभात्याग केला.**




पोलिसांना २७ जून २०२६ रोजी टीईटीची प्रश्नपत्रिका विकली जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचून तीन संशयित व्यक्तींना ताब्यात घेतले. त्यांच्या तपासात २८ जून रोजी होणाऱ्या परीक्षेचे मूळ पेपर आढळून आले. शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रश्नपत्रिकांची खातरजमा केली असता, त्या खऱ्या असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी मुख्य आरोपी राजू श्री प्रयाग शाव याच्यासह इतर दोघांविरुद्ध भिवंडीतील कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २८१/२०२६ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) आणि महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा अनुचित मार्गास प्रतिबंध अधिनियम २०२४ च्या कडक कलमान्वये कारवाई करण्यात आली असून, तिन्ही आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत.

या गुन्ह्याचे गांभीर्य आणि व्याप्ती पाहता, पोलीस महासंचालकांच्या आदेशाने ठाणे शहर पोलीस सह-आयुक्त (गुन्हे) यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. या रॅकेटची मुळे शोधण्यासाठी पोलिसांची दोन पथके बिहारला, तर प्रत्येकी एक पथक हरियाणा आणि दिल्लीला रवाना करण्यात आले आहे. तसेच, भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मकोका कायद्यात आवश्यक ते बदल करण्याची चाचपणीही सरकार करत आहे.

या चर्चेदरम्यान भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी एक महत्त्वाची सूचना केली. “जर प्रश्नपत्रिका आग्र्यामध्ये (उत्तर प्रदेश) छापल्या जात असतील, तर ते तात्काळ बंद करून महाराष्ट्रातच छापण्यात याव्यात,” अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, या पेपर फुटीच्या मुद्द्यावरून विरोधक आक्रमक झाले आणि त्यांनी सरकारच्या कारभाराचा निषेध करत विधानसभेतून सभात्याग केला.

### फेरपरीक्षा मोफत

शिक्षण मंत्र्यांनी उमेदवारांना दिलासा देताना जाहीर केले की, ही फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात घेतली जाईल. यासाठी उमेदवारांकडून कोणतेही अतिरिक्त परीक्षा शुल्क घेतले जाणार नाही, कारण त्यांचे शुल्क आधीच स्वीकारण्यात आले आहे. तसेच, पुढील वर्षापासून टीईटीसह सर्वच परीक्षा पूर्णतः पारदर्शक पद्धतीने 'ऑनलाइन' घेता याव्यात, यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमली जाईल.

## 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' ही शेतीच्या परिवर्तनाची जनचळवळ; मुख्यमंत्री

**महाईन्यूज । मुंबई**

**'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' ही केवळ स्पर्धा नसून, महाराष्ट्रातील शेती परिवर्तनाची व्यापक जनचळवळ आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास हेच त्याचे सर्वात मोठे यश आहे. आजचे १८ हजार शेतकरी गट पुढील काळात ५० लाख शेतकऱ्यांना एकत्र आणतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**



### मुख्यमंत्री स्वतः भेट देणार

फार्मर कपमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकरी गटांच्या गावांना स्वतः भेट देणार आहेत. शेतीचा विकास हे राज्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असले तरी शासन, पाणी फाउंडेशन, कृषी विभाग आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे काम केल्यास पुढील पाच ते सात वर्षांत महाराष्ट्रातील शेती क्षेत्रामध्ये ऐतिहासिक परिवर्तन घडवून आणता येईल. प्रत्येक सहभागी शेतकरी हा आधीच विजेता असून, ही चळवळ राज्यातील कृषी समृद्धीचा नवा अध्याय ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पानी फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित 'फार्मर कप २०२६'चा प्रारंभ करण्यात आला. या वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, पाणी फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते आमिर खान, अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी या वेळी उपस्थित होते. झूम लिंकद्वारे राज्यातील शेतकरी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या वेळी स्मार्ट शेती ॲपचे लोकार्पण करण्यात आले.

'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वासच भविष्यातील कृषी परिवर्तनाचा पाया ठरेल. फार्मर कपमधील १८ हजार शेतकरी गट हे महाराष्ट्रातील शेती क्रांतीचे शिल्पकार ठरणार आहेत, त्यांच्या अनुभवातून लाखो शेतकरी प्रेरणा घेतील. विधानमंडळात महिला शेतकरी विधेयक मंजूर करण्यात येणार आहे. शेतीच्या मालकीमध्ये नाव नसलेल्या महिलांनाही अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता दिली जाणार आहे. मागील वर्षी फार्मर कपमध्ये सहभागी झालेल्या गटांमध्ये सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांच्या उत्पादनात सरासरी ७१ टक्क्यांनी वाढ झाली. सामूहिक खरेदीमुळे कृषी निविष्ठांवर १,५८४ कोटी रुपयांची बचत झाली, तर सामूहिक श्रमांमुळे एकरी सुमारे ६ हजार रुपयांची मजुरीची बचत झाली. गटशेतीमुळे उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होत असल्याचे फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीमध्ये वापर करणारे देशातील पहिले राज्य ठरत आहे. महाविस्तार ॲप आणि फार्मर कपमधील माहिती एकत्रित करून शेतकऱ्यांना अधिक प्रभावी मार्गदर्शन करण्यात येईल. फार्मर कपमधून मिळालेल्या अनुभवांच्या आधारे राज्याच्या कृषी धोरणांमध्येही आवश्यक बदल करण्यात येतील. राज्य शासनाच्या विविध योजनांचे एकत्रित नियोजन (कन्व्हर्जन्स) केल्यास गटशेती अधिक सक्षम होईल. या वर्षी एल निनोमुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी जलसंधारणाच्या सर्व संरचनांची तातडीने दुरुस्ती, गाळ काढणे आणि पाणीसाठा वाढविण्याची कामे हाती घ्यावीत, जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांमुळे पूर्वीच्या दुष्काळी परिस्थितीत मोठा दिलासा मिळाला होता, असेही फडणवीस म्हणाले.

# भारतीय लष्कराचा चीन सीमेवर 'मास्टरस्ट्रोक'

## १ जुलैपासून 'इंटिग्रेटेड बॅटल ग्रुप्स' होणार तैनात, ड्रॅगनची झोप उडणार!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय लष्कराच्या युद्धसज्जतेमध्ये आणि इतिहासामध्ये गेल्या काही दशकांतील सर्वात मोठा आणि ऐतिहासिक संरचनात्मक बदल अखेर प्रत्यक्षात येत आहे. येत्या १ जुलै २०२६ पासून भारतीय लष्कराच्या पहिल्या 'इंटिग्रेटेड बॅटल ग्रुप्स'ना अधिकृतपणे सुरुवात होणार आहे. हे नवे हायटेक युद्धगट पश्चिम बंगालमधील पानागढ येथे मुख्यालय असलेल्या १७ व्या माऊंटन स्ट्राइक कोअरअंतर्गत चीन सीमेवर तैनात केले जाणार असून, यामुळे भारताची प्रहार क्षमता कैक पटीने वाढणार आहे. ही केवळ संघटनात्मक पुनर्रचना नसून भारतीय लष्कराच्या युद्ध लढण्याच्या पद्धतीत अर्थात रणनीतिमध्ये होत असलेला हा मूलभूत बदल आहे.**



गेल्या काही वर्षांत जगभरातील युद्धांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट दिसते, ती म्हणजे युद्धात विजय हा केवळ सैन्य किती मोठे आहे यावर ठरत नाही; तर वेग, समन्वय, तंत्रज्ञान आणि अचूक प्रहारक्षमता यांवर तो अधिक अवलंबून असतो. रशिया-युक्रेन युद्ध, नागोर्नो-कराबाख संघर्ष, इस्रायल-हमास युद्ध तसेच २०२० मधील भारत-चीन सीमावाद या सर्व घटनांनी आधुनिक युद्धाचे स्वरूप बदलल्याचे अधोरेखित केले आहे. भारतीय लष्कराची ही नवी रचना त्या बदलत्या वास्तवाचेच प्रतिबिंब आहे.

भारतीय लष्कराची विद्यमान रचना प्रामुख्याने डिव्हिजन आणि कोअर या मोठ्या लष्करी तुकड्यांवर आधारित आहे. एका कोअरमध्ये साधारणपणे ४० हजारांपासून एक लाख सैनिकांपर्यंतची क्षमता शकते. एवढ्या मोठ्या सैन्यदलाला सज्ज करून सीमेजवळ पोहोचविण्यास वेळ लागतो. विशेषतः हिमालयाच्या परिसरात वावरासाठी कठीण भूप्रदेश, मर्यादित रस्ते आणि प्रतिकूल हवामानामुळे ही प्रक्रिया अधिक संथ होते. सध्याची युद्धे कोणत्याही सैन्याला एवढा वेळ देतच नाहीत. प्रतिस्पर्ध्याने कारवाई सुरू केल्यानंतर काही तासांतच प्रत्युत्तर देणे आवश्यक असते. तुमचे सैन्य योग्य वेळी, योग्य ठिकाणी असणे आवश्यक असते. संपूर्ण कोअर हलविण्याऐवजी आवश्यक तेवढीच पण सर्व क्षमता असलेली लढाऊ तुकडी त्वरित पाठविण्याची गरज निर्माण झाली. याच विचारातून इंटिग्रेटेड बॅटल ग्रुप्सची संकल्पना पुढे आली.

### इंटिग्रेटेड बॅटल ग्रुप म्हणजे काय?

इंटिग्रेटेड बॅटल ग्रुप म्हणजे स्वतःच्या बळावर स्वतंत्रपणे लढू शकणारी, ब्रिगेडपेक्षा मोठी पण डिव्हिजनपेक्षा लहान अशी स्वयंपूर्ण लढाऊ तुकडी. एका IBG मध्ये साधारण पाच हजारांहून अधिक सैनिक असतील. त्यामध्ये केवळ पायदळ नव्हे, तर तोफखाना, अभियांत्रिकी दल, इलेक्ट्रॉनिक्स अँड मेकॅनिकल इंजिनिअर्स (EME), सिग्नल्स, पुरवठा व्यवस्था, वैद्यकीय पथक, दारुगोळा, वाहतूक आणि इतर आवश्यक सहाय्यक दल एकाच कमांडखाली असतील. म्हणजेच ही स्वयंपूर्ण पद्धतीने लढणारी तुकडी असेल. युद्ध सुरू झाल्यावर स्वतंत्रपणे काम करण्यासाठी त्यांना डिव्हिजन किंवा कोअरकडून अतिरिक्त मदतीची वाट पाहावी लागणार नाही. निर्णय, हालचाल आणि हल्ला हे सर्व अधिक वेगाने करता येईल.

### चीनच्या सीमेपासूनच सुरुवात कशासाठी?

पहिले IBGS चीन सीमेकडे तैनात असलेल्या १७ व्या माऊंटन स्ट्राइक कोअरमध्ये तयार होत आहेत. २०१३ मध्ये चीनच्या वाढत्या लष्करी आक्रमकतेच्या पार्श्वभूमीवर या कोअरची सुरुवात करण्यात आली होती. तिचे उद्दिष्ट केवळ संरक्षण नसून, गरज पडल्यास हिमालयीन क्षेत्रात आक्रमक कारवाया करणे हेही आहे. या कोअरअंतर्गत असलेल्या २३ इन्फंट्री डिव्हिजन आणि ५९ माऊंटन डिव्हिजनमधून प्रत्येकी दोन अशा एकूण चार IBGS तयार करण्यात येणार आहेत. याशिवाय स्वतंत्र फायर सपोर्ट ग्रुपही उभारण्यात येणार आहे. या प्रत्येक गटाचे नेतृत्व मेजर जनरल दर्जाचा अधिकारी करेल.

# अनुभवी मल्लिकार्जुन खर्गेंची राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची राज्यसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. खर्गे यांनी सोमवारी राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्या कक्षात खासदारकीची शपथ घेतली. यानंतर २६ जून २०२६ पासून खर्गे यांना पुन्हा राज्यसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्त करण्यात आले.**





मल्लिकार्जुन खर्गे यांचा राज्यसभेतील कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी समाप्त झाला होता. नियमांनुसार २६ जूनपासून त्यांचे विरोधी पक्षनेतेपद देखील समाप्त झाले. पण, त्यानंतर राज्यसभेच्या झालेल्या निवडणुकीत खर्गे पुन्हा निवडून आले. राज्यसभेचे खासदार झाल्यानंतर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी पुनर्निवड करण्यात आली. २६ जून २०२६ पासूनच त्यांना पुन्हा विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता देण्यात आली आहे. खर्गे यांच्या शपथविधीला सोनिया गांधी आणि खासदार प्रियांका गांधी उपस्थित होत्या.

संसदेच्या बुलेटीननुसार, मल्लिकार्जुन खर्गे यांचा २५ जून रोजी कार्यकाळ समाप्त झाल्याने ते विरोधी पक्षनेते पदावरून देखील मुक्त झाले होते. मात्र, राज्यसभेवर पुनर्निवड झाल्यानंतर, सभापतींनी संसदेतील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन आणि भत्ते अधिनियम, १९७७ मधील कलम २ च्या तरतुदींनुसार खर्गे यांना २६ जून २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पुन्हा विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली आहे, अशी माहिती राज्यसभेचे सरचिटणीस पी. सी. मोदी यांनी एका अधिकृत बुलेटीनद्वारे दिली आहे.

मल्लिकार्जुन खर्गे यांनी शपथविधीनंतर एक्स या सोशल मीडियावरुन भावना व्यक्त केल्या. "अभिमान आणि जबाबदारी", अशा शब्दात त्यांना भावना व्यक्त केल्या.

मल्लिकार्जुन खर्गे यांना ७५ वर्षांहून अधिक प्रदीर्घ राजकीय अनुभव आहे. त्यांच्या पुनर्निवडीमुळे आगामी अधिवेशनात विरोधकांची बाजू मांडण्यासाठी इंडिया आघाडीला पुन्हा एकदा एक अनुभवी आणि आक्रमक चेहरा मिळाला आहे.



# प्रियांकाचा स्टायलिश अंदाज

अभिनेत्री प्रियांका चोप्रा स्पष्टवक्तेपणासह तिच्या स्टायलिश लुकसाठी देखील ओळखली जाते. नुकतीच ती 'कान्स लायन्स इंटरनॅशनल फेस्टिवल'मध्ये सहभागी झाली होती. यावेळी तिने परिधान केलेल्या लुकने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. प्रियांकाने डिझायनर सिल्व्हिया चेरासी यांचा 'कलर-ब्लॉक्ड' हॉल्टर' ड्रेस स्टाईल केला आहे. प्रियांकाने 'कान्स लायन्स फेस्टिवल'मध्ये तिचा साधा, पण अत्यंत आकर्षक असा लूक केला होता. यावेळी तिने वेगवेगळ्या रंगांची रंगसंगती असलेला फॉईंग स्टाईल ड्रेस परिधान होता. या ड्रेससह तिने फ्रेडा साल्वाडोर ब्रँडच्या लेदर थॉन्ग सँडल्स स्टाईल केल्या होत्या. या सँडल्सची किंमत सुमारे ३५ हजार ५७४ रुपये आहे. त्यासह तिने गुलाबी रंगाचा नाजुक नेकलेस घातला होता. विशेष म्हणजे, प्रियांकाच्या डिझायनर सिल्व्हिया चेरासी यांच्या या ड्रेसची किंमत सुमारे १.८ लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे. तिचा हया लुक अनेकांच्या पसंतीस पडला असून 'कान्स लायन्स' लूकमधील तिचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, 'कान्स लायन्स इंटरनॅशनल फेस्टिवल ऑफ क्रिएटिव्हिटी' हा एक प्रतिष्ठित सोहळा मानला जातो. या पाच दिवसीय महोत्सवामध्ये सिनेमा, फॅशन आणि मनोरंजन विश्वातील विविध विषयांवर चर्चा केली जाते. यावेळी प्रियांकाने देखील तरुण पिढीचा सिनेमाकडे बघण्याचा दृष्टिकोन, नवीन कल्पना आणि महिलांची जबाबदारी या विषयांवर स्पष्ट मते मांडली.



# 'कंचना 4'मध्ये नयनताराची एंट्री

हॉरर थ्रिलर कंचना फ्रेंचाइजीचे आतापर्यंत तीन चित्रपट आले असून तिन्ही बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरले आहेत. आता राघव लॉरेन्स चौथा चित्रपट घेऊन येत असून यावेळी कहाणीत नवा ट्विस्ट जोडण्यासाठी लेडी सुपरस्टार येत आहे. कंचना 4 चित्रपटात मुख्य भूमिकेत राघव लॉरेन्स असेल, परंतु नव्या अभिनेत्री चित्रपटाच्या कहाणीत ट्विस्ट आणणार आहेत. पूजा हेगडे आणि नोरा फतेही या चित्रपटाचा हिस्सा असतील. आता चित्रपटात तिसऱ्या अभिनेत्रीची म्हणजेच नयनताराची एंट्री झाली आहे. चित्रपटात नयनताराची भूमिका फ्लॅशबॅक दृश्यात दिसून येऊ शकते. परंतु तिच्या भूमिकेवरून अधिक माहिती समोर आलेली नाही. राघव लॉरेन्सने 2011 मध्ये कंचना फ्रेंचाइजी सुरू केली होती. 15 वर्षांपूर्वी या हॉरर थ्रिलरला मोठी पसंती मिळाली होती. यानंतर 2015 मध्ये याचा सीक्वेल प्रदर्शित झाला, मग 2019 मध्ये फ्रेंचाइजीचा तिसरा चित्रपट आला होता. आता चौथा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# बाबूमोशाय वाद पुन्हा चर्चेत

बॉलीवूडची अभिनेत्री चित्रांगदा सिंहने एका चित्रपटाचे शूटिंग अर्धवट सोडल्याची एक जुनी; पण अत्यंत धक्कादायक घटना सध्या मनोरंजन विश्वात पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. माध्यमाशी बोलताना एका पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती, जिथे त्यांनी या जुन्या वादाचा जाहीर खुलासा केला. हा सर्व प्रकार 'बाबूमोशाय बंदूकबाज' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान घडला होता. या चित्रपटात चित्रांगदा सिंह आणि नवाजुद्दीन सिद्दिकी मुख्य भूमिकेत काम करत होते. शूटिंग सुरू असताना, दिग्दर्शकाने चित्रांगदाला नवाजुद्दीनसोबत एक अत्यंत जवळचा आणि उत्तान इंटिमेट सीन (चुंबन दृश्य) देण्यास सांगितले. दिग्दर्शकाला हा सीन ज्या पद्धतीने आणि ज्या कोनातून शूट करायचा होता, त्यावरून सेटवर प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. दिग्दर्शकाची ही मागणी आणि शूटिंगची पद्धत पाहून चित्रांगदा कमालीची अवघडली आणि तिने अशा पद्धतीने सीन देण्यास स्पष्ट शब्दांत विरोध केला. चित्रांगदाने दिग्दर्शकाला सीन बदलण्याची विनंती केली; मात्र दिग्दर्शक आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने दोघांमध्ये सेटवरच तीव्र मतभेद आणि मोठे भांडण झाले. अखेर, आपल्या स्वाभिमानाशी आणि वैयक्तिक मर्यादांशी कोणतीही तडजोड न करता, चित्रांगदाने अत्यंत धाडसी पाऊल उचलले. ती तडकाफडकी सेटवरून निघून गेली आणि तिने तो चित्रपटच कायमचा सोडण्याचा निर्णय घेतला. या मोठ्या वादानंतर निर्मात्यांनी तिच्या जागी बिदिता बाग या अभिनेत्रीला मुख्य भूमिकेसाठी कास्ट केले होते. हा जुना किस्सा समोर आल्यानंतर आता सोशल मीडियावर कलाकार, विशेषतः महिला अभिनेत्रींच्या सेटवरील सुरक्षिततेबाबत आणि स्वाभिमानाबाबत पुन्हा एकदा नवी चर्चा रंगू लागली आहे.

# महिला क्रिकेट संघाचे ऑलिम्पिक तिकीट पक्के!

## ऑलिम्पिकमध्ये तब्बल १२८ वर्षांनंतर क्रिकेटचे पुनरागमन; पुरुष संघाला कधीपर्यंत वाट पाहावी लागणार?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंटरनॅशनल ऑलिम्पिक कमिटीने (IOC) २०२८ मध्ये लॉस एंजिल्स येथे होणाऱ्या ऑलिम्पिक गेम्समधील क्रिकेट स्पर्धेसाठीच्या 'क्वालिफिकेशन सिस्टीम'ला (पात्रता निकष) मंजुरी दिली आहे. ऑलिम्पिकमध्ये तब्बल १२८ वर्षांनंतर क्रिकेटचे पुनरागमन होत असून, महिला आणि पुरुष दोन्ही गटांत टी-२० (T20) फॉरमॅटमध्ये प्रत्येकी ६ संघ सुवर्णपदकासाठी मैदानात उतरतील.**



या स्पर्धेत आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या चार खंडांचे प्रतिनिधित्व निश्चित करण्यात आले आहे. पाच पात्रता जागा सध्याच्या आयसीसी स्पर्धा आणि टी-२० आय (T20I) रँकिंगच्या आधारे ठरवल्या जातील, ज्या सध्याच्या मान्यताप्राप्त आराखड्यानुसार असतील. पुरुष आणि महिला दोन्ही गटांतील सहावी आणि अंतिम जागा २०२७ मध्ये होणाऱ्या नवीन 'आयसीसी ऑलिम्पिक क्वालिफायर' स्पर्धेतून निश्चित केली जाईल.

भारताच्या पुरुष क्रिकेट संघाला ऑलिम्पिक पात्रतेसाठी आणखी ६ महिने वाट पाहावी लागेल. यासाठी ३१ डिसेंबर २०२६ ही कट-ऑफ तारीख निश्चित करण्यात आली आहे. भारताला थेट क्वालिफाय करण्यासाठी या वर्षाच्या शेवटी आयसीसी टी-२० रँकिंगमध्ये आशिया खंडात अव्वल स्थानी राहावे लागेल. भारतीय पुरुष संघाला नुकतेच आयर्लंडविरुद्धच्या दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ऐतिहासिक पराभवाचा सामना करावा लागला आहे.

यजमान देश असल्याने अमेरिकेला पुरुष आणि महिला दोन्ही गटांत प्रत्येकी एक कोटा मिळेल; कारण पात्रता कालावधीत रँकिंगमध्ये अव्वल १५ किंवा त्यापेक्षा चांगल्या स्थानावर राहण्याचा आयसीसीचा निकष अमेरिकेने पूर्ण केला आहे.

### भारतीय महिला संघाचे स्थान निश्चित!

भारतीय महिला क्रिकेट संघाने 'आयसीसी महिला टी-२० वर्ल्ड कप २०२६' च्या माध्यमातून ऑलिम्पिकसाठी थेट क्वालिफाय केले आहे. भारताव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन आणि दक्षिण आफ्रिका या महिला संघांचे स्थान पक्के झाले आहे. विशेष म्हणजे, यंदाच्या महिला वर्ल्ड कपमध्ये भारतीय संघ सेमीफायनल गाठू शकला नाही. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेने उपांत्य फेरीत जागा मिळवली आहे.

# घाणेरड्या ट्रोलिंगला शाहिद आफ्रिदीचे 'ते' विधान कारणीभूत

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**महिला टी२० विश्वचषक २०२६ मधील पाकिस्तानचा प्रवास विजयाने संपला. संघाने आपल्या शेवटच्या सामन्यात नेदरलँड्सचा ३७ धावांनी पराभव केला. मात्र, या सामन्यापूर्वी पाकिस्तान महिला संघाला सलग चार नामुष्कीजनक पराभवाला सामोरे जावे लागले. यामुळे संघ साखळी फेरीतूनच स्पर्धेबाहेर झाला. या खराब कामगिरीवर जोरदार टीका झाली होती. या सर्व पार्श्वभूमीवर, आता पाकिस्तान महिला संघाची माजी कर्णधार सना मीर हिने सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानी महिला क्रिकेटपटूंना सहन कराव्या लागणाऱ्या द्वेषाचा जाहीर खुलासा केला आहे.**




महिला क्रिकेटपटूंबाबत होणारा लैंगिक भेदभाव आणि सोशल मीडियावरील द्वेषाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. यासाठी पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीच्या जुन्या वादग्रस्त वक्तव्यालाही तिने जबाबदार धरले आहे.

माजी क्रिकेटपटू सना मीरने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये तिने महिला क्रिकेटपटूंविरुद्ध पसरवला जाणारा द्वेष, खोटा प्रचार आणि लैंगिक भेदभावावर उघडपणे भाष्य केले आहे. तसेच पाकिस्तान पुरुष क्रिकेट संघाचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीलाही त्याच्या एका जुन्या विधानावरून चांगलेच सुनावले आहे.

सना मीरने म्हटलं आहे की, "आयसीसी टी२० विश्वचषकाच्या चालू मोहिमेबद्दल कुठून बोलायला सुरुवात करावी, हेच समजत नाहीये. खेळाडूंच्या अपेक्षेपेक्षा कमकुवत कामगिरीने सर्वांनाच निराश केले आहे. परंतु, पाकिस्तानमधील महिला क्रिकेटमध्ये मोठी उलथापालथ करण्याची क्षमता आहे, हे सिद्ध करण्यासाठी आम्हाला अनेक वर्षे लागली. आम्ही टी२० विश्वचषक स्पर्धेत भारताचा दोनदा पराभव केला आहे. टी२० मध्ये सुवर्णपदके जिंकली आहेत आणि इंग्लंड, न्यूझीलंड, वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या बलाढ्य संघांनाही पराभूत केले आहे."

"आमचा संघ चांगल्या रँकिंगपर्यंत पोहोचला, काही खेळाडूंना 'आयसीसी हॉल ऑफ फेम'मध्ये स्थान मिळाले. आम्ही प्रत्येक मोठी उपलब्धी साध्य केली. संघाची रचना, देशांतर्गत क्रिकेट आणि इतर त्रुटींवर मी पूर्वीही बोलले आहे आणि पुढेही बोलत राहीन. पण ज्या गोष्टीने मला सर्वात जास्त वेदनादायी आहे, ती म्हणजे आपली मानसिकता."

समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज असल्याची अपेक्षा व्यक्त करत सना मीर म्हणाली की, "जेव्हा कधी महिला किंवा मुलींचा विषय येतो, तेव्हा त्यांच्याबद्दल एक प्रकारची तुच्छतेची भावना दिसून येते. त्यांच्याकडून एखादी चूक झाली, तर त्यांचा आत्मविश्वास पूर्णपणे मोडीत काढण्याचा प्रयत्न केला जातो. जोपर्यंत ही मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपण पुढे जाऊ शकत नाही." ऑस्ट्रेलियाचे उदाहरण देत ती म्हणाली, "आज ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेटमध्ये अव्वल स्थानावर आहे, कारण अनेक वर्षांपूर्वी तिथल्या पुरुष क्रिकेटपटूंनी आपल्या महिला खेळाडूंना समान दर्जा देण्याची मागणी केली होती. त्यांनी क्रिकेट बोर्डाकडे महिलांच्या योगदानाचा आदर राखण्याची भूमिका घेतली होती. इतकेच नाही तर ऑस्ट्रेलियन पुरुष खेळाडूंनी तोपर्यंत नवीन करारांवर स्वाक्षरी केली नव्हती, जोपर्यंत त्यांची ही मागणी पूर्ण झाली नाही."

### काय म्हणाला होता शाहिद आफ्रिदी?

माजी पाकिस्तानी कर्णधार शाहिद आफ्रिदीने म्हटले होते की, महिलांनी क्रिकेट खेळण्याऐवजी स्वयंपाकावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आमच्या महिला खूप छान स्वयंपाक करतात. आमच्या महिलांच्या रक्तात उत्तम स्वयंपाक करणे आहे, त्यांनी त्याच गोष्टींवर लक्ष दिले पाहिजे. जिथपर्यंत क्रिकेटचा संबंध आहे, जे कोणी त्यांना प्रोत्साहन देऊ इच्छितात, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत."

### शाहिद आफ्रिदीला सुनावले खडे बोल

माजी क्रिकेटपटू सना मीरने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये तिने महिला क्रिकेटपटूंविरुद्ध पसरवला जाणारा द्वेष, खोटा प्रचार आणि लैंगिक भेदभावावर उघडपणे भाष्य केले आहे. तसेच पाकिस्तान पुरुष क्रिकेट संघाचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीलाही त्याच्या एका जुन्या विधानावरून चांगलेच सुनावले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

™

ePaper

। मंगळवार ।

दि. 30 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# मोशी आरटीओ परिसरात बेशिस्त पार्किंगचा विळखा

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

मोशी प्राधिकरणातील उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयाबाहेर दररोज होणाऱ्या बेशिस्त वाहन पार्किंगमुळे परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. कार्यालयात विविध कामांसाठी येणारे नागरिक वाहने रस्त्यावर आणि आजूबाजूला अनधिकृतपणे उभी करत असल्याने परिसरातील रहिवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

आरटीओ कार्यालयाच्या शेजारीच अनेक निवासी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांच्या प्रवेशद्वारांसमोर तसेच संरक्षक भिंतीलगत दिवसभर वाहने उभी राहत असल्याने रहिवाशांच्या दैनंदिन ये-जा आणि आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होत आहे. याबाबत स्थानिक नागरिक आणि सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी अनेकदा आरटीओ प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप ठोस उपाययोजना झालेली नाही.

दरम्यान, आरटीओ कार्यालयासाठी स्वतंत्र जागेचा प्रस्ताव अद्याप चर्चेपुरताच मर्यादित असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी तातडीने नियोजन करण्याची मागणी होत आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले की, चिखली येथे वाहन तपासणी केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर कार्यालयाच्या मागील ब्रेक टेस्ट ट्रॅक परिसरात दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. नागरिकांना रस्त्यावर वाहने उभी न करता त्या ठिकाणी पार्किंग करण्याचे आवाहन केले जाणार आहे.

तसेच, येत्या १ जुलैपासून मोठ्या व्यावसायिक वाहनांच्या फिटनेस तपासणीचे काम टप्प्याटप्प्याने चिखली येथील नव्या वाहन तपासणी केंद्रात स्थलांतरित करण्यात येणार आहे. सुरुवातीला मर्यादित प्रमाणात तपासणी सुरू होईल, तर पुढील दोन महिन्यांत संपूर्ण कामकाज चिखली येथे सुरू होणार असल्याने मोशी आरटीओ परिसरातील गर्दी आणि वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

> “ आरटीओ कार्यालयाच्या आवारात आणि परिसरात होणारी गर्दी लक्षात घेता, येत्या १ जुलैपासून मोठ्या वाहनांचे (कमर्शियल गाड्या) फिटनेस तपासणीचे काम चिखली येथील नवनिर्मित वाहन तपासणी केंद्रात टप्प्याटप्प्याने स्थलांतरित करण्यात येणार आहे. सध्या तेथील पोहोच रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून, सुरुवातीला तात्पुरत्या स्वरूपात काही गाड्यांची तपासणी तेथे केली जाईल. पुढील दोन महिन्यांत हे काम पूर्ण क्षमतेने चिखलीत सुरू होईल, ज्यामुळे आरटीओ परिसरातील मोठ्या गाड्यांचा प्रश्न पूर्णपणे सुटणार आहे.
>
> **- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मोशी.**



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026




*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ‘संघर्ष’ हाच भाजप पक्षाचा ‘डीएनए’

## पिंपरी-चिंचवड मध्ये 'लोकशाही रक्षकांचा' कृतज्ञता सोहळा; आमदार श्रीकांत भारतीय उपस्थित

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**२५ जून १९७५ रोजी लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या आणीबाणीच्या काळ्या कालखंडाला ५१ वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर, निगडीतील ग. दि. माडगूळकर सभागृहात भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित ‘लोकशाही रक्षक पुरस्कार’ सोहळ्यात आणीबाणीच्या काळातील संघर्षाचा इतिहास पुन्हा एकदा जिवंत झाला.**




### ज्येष्ठ कार्यकर्त्यांना ‘लोकशाही रक्षक पुरस्कार’

या सोहळ्यात आणीबाणीत सत्याग्रह करणाऱ्या आणि मिसा (MISA) कायद्यांतर्गत जेल भोगणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा आमदार श्रीकांत भारतीय यांच्याहस्ते ‘लोकशाही रक्षक पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सभागृहात उपस्थित अनेकांचे डोळे पाणावले होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन भाजपा संघठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी केले.

आमदार श्रीकांत भारतीय यांनी आपल्या ओघवत्या भाषणातून कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला. हा कार्यक्रम केवळ एक सोहळा नसून नव्या पिढीसाठी संघर्षाचा दीपस्तंभ असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. भारतीय जनता पक्षाचा उदय हा आणीबाणीच्या काळात लोकांनी दिलेल्या असीम समर्पणातून झाला असून, ‘संघर्ष’ हा आमच्या पक्षाचा डीएनए (DNA) आहे, असे ते ठामपणे म्हणाले. इतिहास हा केवळ डोक्याने वाचायचा नसून तो हृदयाने समजून घ्यायचा असतो, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना लोकशाहीसाठी दिलेल्या बलिदानाची जाणीव करून दिली आणि आपापसातील समन्वय वाढवण्याचे आवाहन केले.

शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी आणीबाणीच्या काळातील भीषण आठवणींना उजाळा देत तत्कालीन काँग्रेस सरकारवर जोरदार हल्ला चढवला. हा भारताच्या इतिहासातील सर्वात काळा दिवस होता, ज्या दिवशी जनतेचे मूलभूत अधिकार हिरावून घेतले गेले होते. मात्र, अनेक राष्ट्रभक्तांनी तुरुंगवास सोसला आणि अमानुष छळ सहन केला, परंतु हुकूमशाहीसमोर गुडघे टेकले नाहीत. त्यांच्या याच त्यागामुळे आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेत आहोत, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमास आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार शंकर जगताप, मा. आमदार अश्विनीताई जगताप, संयोजक संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, जेष्ठ नेते मधू जोशी, आणीबाणी सत्याग्रही संघटनेचे आबा खांबे, माजी अध्यक्ष डॉ.बाळकृष्ण नाईक, युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, माजी विरोधी पक्षनेत्या डॉ.गिताताई आफळे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, संजय पटनी, संतोष तापकीर, कैलास सानप, अजय पाताडे, पोपट हजारे, राजू दुर्गे, देवदत्त लांडे, अजित कुलथे, नंदू भोगले, यांच्यासह सर्व मोर्चे, आघाडी व प्रकोष्ठ यांचे अध्यक्ष, सर्व मंडल अध्यक्ष अनेक पदाधिकारी, विविध आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष, आजी-माजी नगरसेवक, शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘भारत माता की जय’ आणि ‘लोकशाही अमर रहे’ अशा घोषणांनी संपूर्ण सभागृह दणाणून गेले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे तर सूत्रसंचालन देवदत्त भिंगारकर यांनी केले आणि आभार कार्यक्रमाचे संयोजक मोरेश्वर शेडगे यांनी मानले.

# भाजपाकडून आगामी संघटनात्मक कार्यक्रमांवर कोअर कमिटीची बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड जिल्ह्याची कोअर कमिटीची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पिंपळे सौदागर येथील शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. आगामी संघटनात्मक कार्यक्रम, पक्ष विस्तार, विविध अभियानांचा आढावा आणि महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर पक्षाची रणनीती यांसह विविध महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली.**





> “भारतीय जनता पक्षाचे सामर्थ्य हे आपल्या समर्पित कार्यकर्त्यांमध्ये आणि मजबूत संघटनात आहे. आगामी काळात प्रत्येक बूथ अधिक सक्षम करून केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना तळागाळातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या एकजुटीच्या बळावर पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचे संघटन आणखी भक्कम करू.”
>
> - शत्रुघ्न काटे, **शहराध्यक्ष, भाजपा.**

बैठकीत गेल्या काही महिन्यांत शहरभर प्रभावीपणे राबविण्यात आलेल्या पक्षाच्या विविध अभियानांचा आढावा घेण्यात आला. अभियानांमध्ये कार्यकर्त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचे कौतुक करण्यात आले. आगामी काळात संघटन अधिक गतिमान करण्यासाठी, बूथ स्तरावरील यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आवश्यक नियोजनावरही चर्चा झाली. पक्षाच्या बळकटीकरणासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय एकमताने घेण्यात आल्याची माहिती बैठकीनंतर देण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, “पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पक्षाचे संघटन भक्कम असून आगामी काळात ते अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सर्व ज्येष्ठ नेते, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून संघटनात्मक कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविले जातील. पक्षाचा विचार आणि शासनाच्या योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यावर आमचा भर राहील.”

या बैठकीला आमदार महेशदादा लांडगे, आमदार शंकरशेठ जगताप, आमदार अमितभाऊ गोरखे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमरजी साबळे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वरभाऊ शेडगे, सदाशिवराव खाडे तसेच सत्तारूढ पक्षनेते प्रशांतभाऊ शितोळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर पक्षाच्या आगामी संघटनात्मक उपक्रमांना अधिक गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून, पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकजुटीने काम करतील, असा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.

# ‘रेड झोन’ प्रश्नावर समन्वय समिती

## आमदार महेश लांडगे यांची महत्वपूर्ण लक्षवेधी; राज्यशासन केंद्राकडे पाठपुरावा करणार

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील ‘रेड झोन’ बाधित नागरिकांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांवर विधानसभेत सोमवारी सविस्तर चर्चा झाली. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधी उपस्थित केली आणि ‘रेड झोन’मुळे रखडलेल्या विकासकामांसह नागरिकांच्या अडचणी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी राज्य शासन, संरक्षण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या समन्वय समिती स्थापन करण्यात येईल.**




“रेड झोनचा प्रश्न हा केवळ जमीन किंवा बांधकामाचा नाही, तर हजारो कुटुंबांच्या भविष्याशी आणि त्यांच्या न्यायाच्या हक्काशी जोडलेला आहे. समन्वय समितीची स्थापना हा या लढ्याला मिळालेला महत्त्वाचा टप्पा आहे. समितीचा अहवाल, केंद्र सरकारकडे प्रभावी पाठपुरावा आणि कायमस्वरूपी तोडगा निघेपर्यंत माझा संघर्ष आणि पाठपुरावा अविरत सुरू राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनखाली रेड झोनग्रस्त प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देणे, हीच माझी बांधिलकी आहे.”

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

एका महिन्यात अहवाल सादर करून केंद्र सरकारकडे रेड झोन कमी करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

मुंबई येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अविधेनश सुरू आहे. या निमित्ताने आज सभागृहात लक्षवेधी सूचनांवर बोलताना आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ४ लाख नागरिकांशी संबंधित आणि ४५ हजार नवासी, १५ हजार अनिवासी असे एकूण सुमारे ६२ हजार रेडझोन बाधत मळकती आहेत. यामुळे सुमारे ४ लाख नागरक थेट प्रभावीत होत आहेत. याबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधले.

या चर्चेनंतर संबंधित मंत्र्यांनी या गंभीर प्रश्नाची दखल घेत, एका महिन्याच्या आत समन्वय समितीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर हा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवून रेड झोनची व्याप्ती कमी करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात देण्यात आले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. रेड झोन बाधित नागरिकांना न्याय मिळावा आणि त्यांच्या मालमत्तेवरील निर्बंध दूर व्हावेत, यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### आमदार महेश लांडगे यांनी मांडलेले मुद्दे

पिंपरी-चिंचवडमधील चिखली, रावेत, तळवडे, निगडी, भोसरी, मोशी, दिघी ते किवळे-मामुर्डी परिसरातील २००० यार्डांच्या रेड झोनमुळे हजारो नागरिकांचा विकास गेली अनेक वर्षे रखडला आहे. घरांची दुरुस्ती, नवीन बांधकाम, बँक कर्ज तसेच मालमत्तेची खरेदी-विक्री यावर निर्बंध आल्याने नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. महापालिका मिळकत कर वसूल करत असली तरी रस्ते, पाणी आणि इतर मूलभूत सुविधा देण्यास टाळाटाळ होत असून अनेक प्रकल्पही रखडले आहेत. या प्रश्नाच्या कायमस्वरूपी समाधानासाठी राज्य सरकार, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांची समिती नेमून एका महिन्यात केंद्राकडे रेड झोन कमी करण्याचा प्रस्ताव पाठवण्याची मागणी करण्यात आली. तसेच रेड झोनचा प्रश्न निकाली निघेपर्यंत नागरिकांच्या घरांवर कोणतीही कारवाई करू नये आणि बाधितांना न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली.

### राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिलेले उत्तर

आमदार महेश लांडगे यांनी मांडलेला रेड झोनचा प्रश्न वस्तुस्थिती असल्याचे शासनाने मान्य करत, २०१३ पूर्वी दिलेल्या बांधकाम परवानग्यांमुळे ही समस्या निर्माण झाल्याचे स्पष्ट केले. २०२५ मध्ये नव्या तंत्रज्ञानाद्वारे बाधित मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले असून काही भागांना १०० मीटरपर्यंत दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रश्नाच्या कायमस्वरूपी सोडवणुकीसाठी राज्य शासन, संरक्षण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या समन्वय समितीची स्थापना करण्यात येणार असून ती एका महिन्यात अहवाल सादर करणार आहे. त्यानंतर मुख्यमंत्री आणि संरक्षण मंत्र्यांमार्फत रेड झोन कमी करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. दरम्यान, नागरिकांना दिलासा म्हणून मालमत्ता करातील शास्तीमध्ये ५० टक्के सवलत देण्यात आली असून संरक्षण विभागाकडून मोजणी नकाशे प्रमाणित झाल्यानंतर आरक्षित जागांचे अधिग्रहण करून रेडीरेकनर दराने मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे सीनियर केजी विद्यार्थ्यांचा ‘ग्रीन डे’ साजरा

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे आज सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘ग्रीन डे’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, निसर्गप्रेम आणि पावसाळ्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत आनंददायी पद्धतीने पोहोचविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



या निमित्ताने विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे आकर्षक पोशाख परिधान केले होते. शाळा हिरव्या रंगाच्या सजावटीने नटली होती. विद्यार्थ्यांनी झाडे, पाने, फुले, फळे तसेच पर्यावरण संरक्षणाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिक्षकांनी वृक्षारोपणाचे महत्त्व, स्वच्छ पर्यावरणाचे फायदे तसेच पावसाळा हा निसर्गाला नवसंजीवनी देणारा ऋतू असल्याचे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले.

विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी, झाडांचे संवर्धन करावे आणि निसर्गाशी मैत्री करावी हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

शाळेच्या व्यवस्थापनाने आणि मुख्याध्यापकांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरणप्रेम आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना विकसित होते, असे सांगत सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station